# मेट्रो-३ मार्गिकेने केला २३ वा टप्पा पूर्ण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ च्या भुयारीकरणाचा २३ वा टप्पा गुरुवारी पूर्ण करण्यात आला आहे. टीबीएम कृष्णा-१ ने नयानगर ते धारावीमधील ५८९.४ मी. इतके अंतर ४२१ रिंग्जच्या साहाय्याने पूर्ण केले. अद्याप पॅकेज ४ मध्ये १०.९ कि.मी.पैकी ८.२ कि.मी. भुयारीकरण पूर्ण झाले असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएल) दिली.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या संपूर्णत: भुयारी मार्गिकेच्या कामामध्ये एकूण ३२ भुयारी टप्पे पार पडणार असून त्यातील आत्तापर्यंत २३ टप्पे पार करण्यात आले आहेत.

गोदावरी २ या टनेल बोरिंग मशीनच्या मदतीने पॅकेज ६मधील विद्यानगरी ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी १ या स्थानकांदरम्यान डाऊन लाइनच्या दिशेने २.८ किलोमीटरचे अंतर २ हजार ४८ रिंग्जच्या मदतीने गेल्या दोन आठवड्यांपूर्वीच पूर्ण करण्यात आले होते.

गेल्या २२ ऑक्टोबर रोजी एमएमआरसीएलने २१वा भुयारी टप्पा पार केला होता.

सूर्या-२ या टनेल बोरिंग मशीनची यासाठी मदत घेण्यात आली. विधान भवन ते चर्चगेट या स्थानकांदरम्यान डाऊन लाइनच्या दिशेने ४८२ मीटर इतके अंतर ९० दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आले होते. धारावी येथे भुयारीकरणाचा २०वा टप्पा पार पडला.